D.G.P. (Trg.)
4 OCT 2022
Inward No.

**पोलीस शिपाई पदावर नियुक्ती करताना चारित्र्य पडताळणी संदर्भातील प्रकरणांवर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घेतलेल्या निर्णयाविरुद्धच्या अपिलांवर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचे अधिकार अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांना प्रदान करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस-१७१८/प्र.क.२११/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ३० सप्टेंबर २०२२

**वाचा :-**

गृह विभाग, शासन निर्णय समक्रमांक, दि.१९.०७.२०१७

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती संदर्भात चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणीच्या साक्षांकन नमुन्यात उमेदवारांनी दिलेली माहिती तसेच अशा उमेदवारांच्या संदर्भात पोलीस विभागातर्फे करण्यात आलेल्या पडताळणीच्या अनुषंगाने सदर उमेदवाराची शासन सेवेत नियुक्ती करावी किंवा कसे, याचा निर्णय घेण्याकरिता नियुक्ती प्राधिकारी यांना सहाय्य होण्यासाठी महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)नियम,२०११ मधील नियम ५ मधील तरतुदीच्या अनुषंगाने दि.१९.०७.२०१७ रोजीच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने घेतलेल्या निर्णयाविरुध्द संबंधित उमेदवाराला मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण/शहरे) यांचेकडे अपील दाखल करता येईल अशी तरतुद आहे. प्रस्तुत तरतुदीमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती संदर्भात चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणीच्या अनुषंगाने सदर उमेदवाराची शासन सेवेत नियुक्ती करावी किंवा

प्रशिक्षण



कसे, याचा निर्णय घेण्याकरिता नियुक्ती प्राधिकारी यांना सहाय्य होण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाविरुध्द मा. राज्यमंत्री गृह (ग्रामीण/शहरे) यांचेकडे असलेल्या अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचे अधिकार याद्वारे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव (अपील व सुरक्षा ), गृह विभाग यांना पुढील आदेशापर्यंत प्रदान करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गणेश गायकवाड )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (अ. व सु.),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
६. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. प्राधान सचिव (विधि), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ०३२.
१०.पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११.सर्व विभागीय आयुक्त
१२.सर्व पोलीस आयुक्त
१३.सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
१४.सर्व जिल्हाधिकारी/सर्व निवासी उपजिल्हाधिकारी
१५.सर्व पोलीस अधीक्षक/सर्व समादेशक
१४.सर्व जिल्हा सरकारी वकील
१५. निवडनस्ती (पोल-५अ)